**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४५ वी बैठक**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **२१ जुलै २०१५ (मंगळवार)** |
| **वेळ** | **:** | **सकाळी ११.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय<br>मुंबई - ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. संजय भाटिया<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको, मुंबई | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्रीमती मालिनी शंकर
अति. मुख्य सचिव,
पर्यावरण विभाग

श्री. संजय सेठी
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. वेणूगोपाल रेड्डी
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
अति.महानगर आयुक्त (३) व
व्यवस्थापकीय संचालक,
मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन

श्री. प्र. द. ममदापुरे
प्रमुख, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अडुसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सु. ल. पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. स. भ. तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. अ. रा. वानखेडे
उप महानगर आयुक्त (भूमी / मिळकत)
भूमी शाखा, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, कार्यकारी समितीच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, कार्यकारी समितीने श्री.चार्ल्स कोरीया यांच्या दिनांक १६ जून, २०१५ रोजी झालेल्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त केला व सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहिली. त्यानंतर कार्यकारी समितीने श्री.चार्ल्स कोरीया यांच्या निधनाबद्दलच्या शोक ठरावास **(जोडपत्र)** मंजूरी दिली.

त्यानंतर, श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग व श्री. अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यकारी समितीचे नवे 'पदसिध्द सदस्य' म्हणून व श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांचे 'पदसिध्द निमंत्रित' म्हणून महानगर आयुक्त यांनी स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर, श्री. सतिश गवई, माजी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग व श्री.सिताराम कुंटे, माजी महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कार्यकारी समितीचे 'पदसिध्द सदस्य' तसेच श्री.अजोय मेहता, माजी प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी कार्यकारी समितीचे ''पदसिध्द निमंत्रित'' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा महानगर आयुक्त यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या २४४व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या २४४व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालावर चर्चा करताना खालील बाबींवर चर्चा करण्यात आली :-

**बाब क्र.७** : या विषयावर श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, या ठिकाणी पुल बांधणार आहात की, रस्ते बांधणार आहात? त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर ठिकाणी अंतर्गत रस्ते बांधणार आहेत.

**बाब क्र.१९** या विषयावर चर्चा करताना मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, श्रीमती अश्विनी भिडे, अति. महानगर आयुक्त व व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांची प्राधिकरणाच्या आस्थापनेवर अति. महानगर आयुक्त या पदावर कार्यालयीन आदेश काढण्याबाबतचे आदेश कोण काढणार आहेत? त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर आदेश शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने काढणे आवश्यक आहे.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत फॉरेस्ट नाका ते बदलापूर (राज्य महामार्ग क्र.३५) साखळी ९२/५०० कि.मी. ते साखळी ९८/५९० कि.मी. या रस्त्याचे रुंदीकरण व मजबूती करण्याच्या कामाची निविदा मंजूर करणे.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत बृहन्मुंबई महानगर पालिका क्षेत्राबाहेरच्या प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील अतिरिक्त कामांचा समावेश करुन प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीच्या ठराव क्र.१३०४ अन्वये रस्त्याच्या व उड्डाणपुलाच्या रु.३६२८.५१ कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून यामध्ये सदर कामाचा समावेश आहे. या कामाची प्रशासकीय मान्यता रु. ४२.०० कोटी आहे. सदर कामासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सल्लागारामार्फत तयार केला असून कामाचे आराखडे व रु.४६.२० कोटी रक्कमेचे सविस्तर अंदाजपत्रक प्राधिकरणास प्राप्त झाले. अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे जिल्हा सन २०१३-१४ मंजूर दरसुचीवर आधारीत आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सल्लागारांनी सादर केलेल्या रु.४६,१९,६९,५९६/- अंदाजपत्रकीय रक्कमेस B1 (टक्केवारी) स्वरुपात ई-निविदा वृत्तपत्राद्वारे दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या. या कामाकरिता पाच कंत्राटदारांनी ई-निविदा सादर केल्या. यापैकी तीन निविदाकार आर्थिक निविदा उघडण्यास पात्र झाले. प्राप्त निविदांची माहिती खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | कंत्राटदाराचे नाव | सादर आर्थिक देकार | मुल्यांकन |
|---|---|---|---|
| १) | मे.अजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | ११.२५% कमी दर | द्वितीय लघुत्तम |
| २) | मे.विटराग कन्स्ट्रक्शन कं. | १६.२७% कमी दर | प्रथम लघुत्तम |
| ३) | मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्ट्स | ५.०४% कमी दर | उच्चतम |

उर्वरीत २ कंत्राटदार विहीत काम करण्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करु न शकल्याने त्यांची निविदा उघडण्यात आली नाही व स्पर्धेतून बाद करण्यात आले.

३.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, यामध्ये मे.विटराग कन्स्ट्रक्शन कं. यांची रु.३८,६८,०७,१४२.७३ (१६.२७% कमी दर) आर्थिक देकार ही लघुत्तम निविदा आहे, तर मे.अजवाणी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या निविदाकाराची रु.४०,९९,९८,०१६.४५ या रक्कमेचे द्वितीय लघुत्तम निविदा आहे. निविदेची विधीग्राहयता एकूण १२० दिवस आहे. लघुत्तम निविदाकारांनी पत्र दिनांक १५ एप्रिल, २०१५ अन्वये दर पृथःकरण प्राधिकरणास सादर केले असून आर्थिक देकार रु.३८,६८,०७,१४२.७३ व्यवहार्य असल्याचे मान्य केले आहे.

३.४ याबाबत महानगर आयुक्त यांनी पुढे सांगितले की, प्राप्त सर्व निविदाबाबत अति.महानगर आयुक्त (१) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली व निविदा समितीने लघुत्तम निविदा रु.३८,६८,०७,१४२.७३ (१६.२७% कमी दर) स्विकृतीची शिफारस केली आहे. सदर कामासाठी होणारी संभाव्य भाववाढ (escalation) प्रत्यक्ष कामानुसार देय राहील. सदरहू कामासाठी प्राप्त झालेल्या लघुत्तम देकारांचे कंत्राटदार अनुभवी आहेत व कामासाठी आवश्यक असणारी देय सामुग्री त्यांच्याकडे स्वतःच्या मालकीची आहे.

३.५ याबाबत श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, मे. विटराग कन्स्ट्रक्शन यांनी यापूर्वी कोणती कामे केलेली आहेत? त्यावर मुख्य अभियंता यांनी सदर कंत्राटदाराने अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्याचे एक काम व बहुतांशी बृहन्मुंबई महापालिकेत या प्रकारची कामे केल्याचे सांगितले. तसेच श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदरील कामाचे त्रयस्थ संस्थेमार्फत तांत्रिक परिक्षण (Third Party Audit) करण्यात येते का असे विचारले. त्यावर मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, विस्तारीत मुंबई पायाभुत प्रकल्पाच्या (Extended MUIP) सर्वच कामांचे अशा प्रकारचे परिक्षण करण्यात येते.

३.६ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, संबंधित कंत्राटदाराची हे काम करण्याची क्षमता तपासण्यात यावी, कारण इतरही ब-याच कामांमध्ये हेच कंत्राटदार निविदा भरत असतात. प्राधिकरणाच्या इतर कामांची निविदा मंजूर करतेवेळी देखील निविदाधारकांची त्यांनी प्राधिकरणाच्या किंवा इतर संस्थांच्या एकूण हाती घेण्यात आलेल्या कामाचा व निविदाधारकाच्या क्षमतेचा विचार करण्यात यावा. सदरील बाब तपासून घेण्याचे मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग यांनी मान्य केले.

३.७ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदरहू प्रस्तावित रस्ता १५ मी. व १२ मी. रुंदीत (२ + २ मार्गिका) बांधण्यात येत असून सार्वजनिक बांधकाम विभाग (१.८० कि.मी.) डांबरीकरण स्वरुपाचे तर कुळगांव-बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात (४.२९ कि.मी.) सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यात येणार आहे. रस्त्यालगत भूमीगत सेवेसाठी उपयोगिता वाहिन्यांची तरतूद सुध्दा करण्यात आली आहे. याशिवाय पदपथसह पर्जन्यवाहिन्या व मो-या बांधण्याचा सुध्दा समावेश असून सदरहू काम पूर्ण करण्याचा कालावधी पावसाळयासह १८ महिने आहे.

३.८ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदरहू कामासाठी प्राप्त निविदा स्पर्धात्मक व वाजवी आहे व मे.विटराग कन्स्ट्रक्शन कं. यांची रु. ३८,६८,०७,१४२.७३ (१६.२७% कमी दर) यांची आर्थिक देकार ही लघुत्तम निविदा असल्यामुळे प्रस्तावास कार्यकारी समितीने मान्यता देण्याची विनंती केली.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२८० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत व त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत फॉरेस्ट नाका ते बदलापूर (राज्य महामार्ग क्र.३५) साखळी ९२/५०० कि.मी. ते साखळी ९८/५९० कि.मी. या रस्त्याचे रुंदीकरण व मजबूती करण्याची कामे प्राप्त झालेली मे. विटराग कन्स्ट्रक्शन कं. यांनी सादर केलेली रु.३८,६८,०७,१४२.७३ (१६.२७% कमी दर) रक्कमेची निविदा स्विकारण्यास, अधिक प्रत्यक्ष कामानुसार अनुज्ञेय भाववाढ (Escalation) अदा करण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.४ :** **कळंबोली स्टील मार्केट व नावडे फाटा जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपुलांच्या बांधकामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणीकरीता सल्लागाराची नेमणूक करणे.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने व मुंबई महानगर क्षेत्रातील पायाभूत सुविधांवरील ताण कमी करण्यासाठी विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी सुमारे रु. ३६२८.५१ कोटी इतक्या अंदाजित रकमेच्या अतिरिक्त रस्ते सुधारणा व उड्डाणपूल बांधण्याच्या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील कळंबोली स्टील मार्केट येथे तसेच तळोजा एमआयडीसीकडे जाणा-या नावडे फाटा हे दोन्ही जंक्शन अत्यंत गजबजलेले असून या महामार्गावरील प्रामुख्याने जड वाहतूक गेल्या काही वर्षांत प्रचंड प्रमाणात वाढलेली दिसून येते. त्यामुळे या ठिकाणी रात्रंदिवस वाहतूकीची कोंडी आढळून येते. याकरीता कळंबोली स्टील मार्केट जंक्शन व नावडे फाटा जंक्शन येथे उड्डाणपूलाचे काम हाती घेणे प्रस्तावित आहे. सदर कामांसाठी पूर्व निविदा कामांकरीता तसेच प्रकल्प व्यवस्थापनासाठी सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. वर उल्लेखिलेल्या कामांकरीता इच्छूक सल्लागारांकडून प्रकल्प व्यवस्थापन व संकल्पचित्र पडताळणी यासाठी निविदा वर्तमानपत्रात व ई-निविदा व्द्रारे जाहिरात देऊन मागविण्यात आले. त्या अनुसार ७ सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले.

४.२ महानगर आयुक्त यांनी कार्यकारी समितीस प्रस्ताव सादर करताना असेही सांगितले की, विनंती प्रस्तावाच्या अटीनुसार मे. श्रीखंडे कन्सल्टन्ट प्रा.लि. यांचे संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषात सर्वात अधिकतम गुण प्राप्त झालेले आहेत. तसेच वित्तीय प्रस्तावामध्ये सल्लागाराने मागणी केलेली फी रु.१,४०,७६,०००/- + सेवाकर लघुत्तम आहे. निविदा समितीने विनंती प्रस्तावाच्या अनुषंगाने तांत्रिक व वित्तीय निकषाच्या बाबींची छाननी करुन मे. श्रीखंडे कन्सल्टन्ट प्रा.लि. यांची निविदा मान्य करण्याची शिफारस केलेली आहे.

४.३ श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, सल्लागाराकडे पुरेसे मनुष्यबळ असल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच त्यांचेकडे असलेली एकूण कामे व त्याचे मनुष्यबळ याचा विचार निविदा समितीने (Tender Committee) करावा.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२८१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे कळंबोली स्टील मार्केट व नावडे फाटा जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामाकरीता निविदा पूर्व कामे, प्रकल्प व्यवस्थापक व संकल्पचित्र पडताळणी करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. श्रीखंडे कन्सल्टन्ट प्रा.लि. यांची रु **१,४०,७६,०००/- अधिक सेवाकर** (Service Tax) इतक्या शुल्कावर नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमजबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ :** **शिळफाटा - महापे रस्त्यावर एल.ॲण्ड टी. जंक्शन येथे चौपदरी उड्डाणपूल व सेवा रस्त्यासहीत उर्वरीत रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणे या कामासाठी लघुत्तम निविदेच्या प्रकल्प सल्लागाराची संकल्पचित्र पडताळणी, बांधकाम देखरेख, दायित्व कालावधीतील देखरेख हया टप्प्यांसाठी नेमणूक करणे.**

५.१ या प्रस्तावाविषयी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने व मुंबई महानगर क्षेत्रातील पायाभूत सुविधांवरील ताण कमी करण्यासाठी विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या अतिरिक्त रस्ते सुधारणा व उड्डाणपूल बांधण्याच्या कामास सुमारे रु. ३६२८.५१ कोटी इतक्या अंदाजित रक्कमेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून त्यात विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत 'शिळफाटा-महापे रस्त्यावर एल.ॲण्ड.टी. जंक्शन येथे चौपदरी उड्डाणपूल व सेवा रस्त्यासहीत उर्वरित रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण' करणे या कामासाठी रु.६९ कोटीची प्रशासकीय मान्यता समाविष्ट आहे. शिळफाटा ते महापे रस्त्याच्या रुंदीकरणाचे व मजबूतीकरणाचे मुख्य काम यापूर्वीच सुरु झालेले असून सदर काम पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहे. केवळ एल.ॲण्ड.टी. जंक्शनवरील १ उड्डाणपूल, सेवारस्ते आणि मुख्य रस्त्याच्या ३ भागांचे काम असे उर्वरीत कामाचे स्वरुप आहे. हया कामाच्या निविदापूर्व बाबी

सध्याच्या मूळ कामाचे प्रकल्प सल्लागार मे.एस.एन.भोबे आणि असोसिएट यांच्या कडून पूर्ण करुन घेण्यात आले. त्यानुसार उर्वरीत कामाच्या कंत्राटासाठी ई-निविदा पध्दतीने प्रक्रीया पूर्ण करण्यात आली. त्यामधील लघुत्तम निविदाकार मे.एन. ए. कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांच्या निविदेला कार्यकारी समितीच्या दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या २४४व्या बैठकीत मान्यता देण्यात आली. दरम्यानच्या काळात वर उल्लेखिलेल्या कामाकरीता इच्छूक सल्लागारांकडून संकल्पचित्र पडताळणी तसेच बांधकाम व दायित्वकालावधीतल्या प्रकल्प व्यवस्थापन यासाठी विनंती प्रस्ताव दिनांक २८ ऑगस्ट, २०१४ रोजी वर्तमानपत्रात व ई-निविदाव्द्रारे जाहिरात देऊन मागविण्यात आले. सर्व निविदा प्रक्रीया पूर्ण केल्यानंतर मे.एक्स. सी. सी. इंजिनिअर्स ॲण्ड प्लॅनर्स यांची रु.८१,२२,५००/- अधिक सेवाकर ही निविदा लघुत्तम आढळून आली आहे. यास्तव मे. एक्स. सी. सी. इंजिनिअर्स ॲण्ड प्लॅनर्स यांनी भरलेला रु.८१,२२,५००/-(अधिक प्रचलित दराप्रमाणे सेवाकर) इतक्या रक्कमेचा आर्थिक प्रस्ताव स्विकारणे आणि त्यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणे प्रस्तावित आहे.

५.२ श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी मे. एक्स. सी. सी. इंजीनिअर्स ऍण्ड प्लॅनर्स यांना असणा-या अनुभवाबाबत विचारणा केली असता, श्री. स. भ. तामसेकर, मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, मे.एक्स. सी. सी. इंजिनिअर्स ऍण्ड प्लॅनर्स यांनी यापूर्वी प्राधिकरणात काही कामे पूर्ण केली आहेत व खेरवाडी जंक्शन येथील वेळेच्या आधी पूर्ण करण्यात आलेल्या उड्डाणपूलाच्या प्रकल्पावर हेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार होते.

**निर्णय :** **<u>त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने खालील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १२८२ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे 'शिळफाटा - महापे रस्त्यावर एल.ॲण्ड.टी. जंक्शन येथे चौपदरी उड्डाणपूल व सेवा रस्त्यासहीत उर्वरित रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण करणे' या कामासाठी संकल्पचित्र पडताळणी, बांधकाम देखरेख, दायित्व कालावधीतील देखरेख हया टप्प्यांसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून **मे. एक्स. सी. सी. इंजिनिअर्स ॲड प्लॅनर्स** यांची **रु. ८१,२२,५००/- अधिक सेवाकर** (Service Tax) इतक्या शुल्कावर नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : ओशिवरा जिल्हा केंद्र, मुंबई येथील विकास आराखडयानुसार प्राधान्य-१ मधील रस्ते विकसित करणे तसेच तेथे मल:निसारण व जलवाहिन्या टाकण्याबाबत असलेल्या लघुत्तम निविदेस मान्यता मिळण्याबाबत.**

६.१ या प्रस्तावाबद्दल माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, आोशिवरा जिल्हा केंद्र येथे अनेक निवासी व व्यावसायीक वसाहती मोठया प्रमाणावर निर्माण होत आहेत तसेच ओशिवरा येथे नवीन रेल्वे स्थानक सुरु होत असल्याकारणाने, कार्यकारी समितीच्या दिनांक ०४ जुलै, २०१४ रोजीच्या २४२व्या बैठकीमध्ये पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी रस्ते, जलवाहिन्या व मलनि:सारण वाहिन्यांची कामे तीन प्राधान्यांमध्ये हाती घेण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन प्राधान्य-१ मधील रस्त्यांचे रु.३४.७६ कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन सदर कामासाठी ई-निविदा प्रक्रियेने निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार चार निविदाकारांनी त्यांच्या ई-निविदा सादर केल्या. मे. रेलकॉन इंन्फ्राप्रोजेक्टचा लघुत्तम देकार हा अंदाजित रकमेपेक्षा ३६.९९ टक्के इतका कमी दिसून आला. सदर निविदा दर हा खूप कमी दराचा असल्यामुळे कंत्राटदारास काम करणे शक्य होणार नाही असे दिसून आल्याने निविदा फेटाळण्यात येऊन द्वितीय मागणी करण्यात आली. निविदेच्या द्वितीय मागणीसाठी पुन:श्च वृत्तपत्रात जाहिरात देऊन ई-निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार तीन निविदाकारांनी ई-निविदा सादर केल्या. द्वितीय मागणीमध्येसुध्दा मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टची निविदा ३४.२० टक्के कमी दराची व लघुत्तम असल्याचे दिसून आले.

६.३ सदर देकारावर चर्चा करताना कार्यकारी समितीच्या सदस्यांनी, कंत्राटदारांनी निविदा बाहेरील अतिरिक्त कामे देण्याबाबत बंधन असावे व डी-वॉटरींग व सेवावाहिन्या स्थलांतर करण्याच्या कामांवर विशेष लक्ष देऊन कामाच्या प्रमाणात देयके मंजूर करण्यात यावीत, तसेच त्रयस्थ सल्लागारांमार्फत कामाची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी अशी सूचना केली. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर कामाच्या देखरेखीसाठी प्रकल्प सल्लागारांची नेमणूक करण्यात आली असून गुणवत्ता तपासणीसाठी त्रयस्थ सल्लागारांची नेमणूक देखील करण्यात येणार आहे. तसेच सेवावाहिन्या स्थलांतरांचे काम सेवावाहिन्या पुरवठाकारांकडून करुन घेण्यात येते त्यामुळे कंत्राटदारास अशी कामे दिली जात नाहीत.

डी-वॉटरींग व इतर कामांची देयके ही प्रत्यक्ष मोजमापानुसार निविदेत नमुद केलेल्या दरांप्रमाणे करण्यात येत असल्याचा खुलासा मुख्य अभियंता यांनी केला. त्यानंतर, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदरील कंत्राटदाराची हे काम करण्याची क्षमता तपासण्यास सांगितले, त्यावर कार्यवाही करण्यात येईल असे मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग यांनी सांगितले. तसेच कंत्राटदारांकडून द्वितीय मागणीत आलेला दर हा सदर कामाच्या बाजारभावाप्रमाणे असल्याचे सिध्द झाल्याने त्यास मान्यता देण्याची शिफारस केली.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने खालील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२८३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहायभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे ओशिवरा जिल्हा केंद्र, मुंबई येथील विकास आराखडयानुसार प्राधान्य-१ मधील रस्ते विकसित करणे तसेच मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे हया कामाकरिता द्वितीय मागणीत प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची अंदाजपत्रापेक्षा ३४.२० टक्के कमी दराची लघुत्तम देकार असलेली निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही योग्य त्या फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ :** **मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक / युनिव्हर्सिटी जंक्शन व बीकेसी जंक्शन मिळून मिठी नदी ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्ग बांधणे व एम.टी.एन.एल जंक्शन, बीकेसी ते लालबहादूर शास्त्री मार्ग उड्डाणपूलास जोडणारा उन्नत मार्ग बांधणे (भाग-१) आणि बीकेसी ते वाकोला जंक्शन (वाकोला नाल्याच्या बाजूने) उन्नत मार्ग बांधणे (भाग-२).**

७.१ या प्रस्तावाविषयी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेल्या चित्रफितीचे (video clip) सादरीकरणे केले.

७.२ त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गांना जोडणारा सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता कमी लांबीचा (६.४५ कि.मी.) असल्याने मुंबई उपनगरातील पूर्व-पश्चिम वाहतुकीची घनता या मार्गावर दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे या मार्गावर असलेल्या तीन जंक्शनवर वाहतुकीची कोंडी होत असून वांद्रे-कुर्ला जंक्शन ते वाकोला जंक्शनपर्यंत जाण्यासाठी वाहनांना बराच वेळ लागत आहे. सदर तीन जंक्शन खालीलप्रमाणे आहेत :-

- वांद्रे-कुर्ला संकुल जंक्शन
- मुंबई युनिव्हर्सिटी जंक्शन/आंबेडकर चौक
- वाकोला जंक्शन

सदर जंक्शन असलेला रस्ता हा मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील भाग असून या भागाची लांबी ३ कि.मी. व रुंदी ४५.७ मी. पेक्षा कमी आहे व वाहतुकीची घनता वाढल्याने जंक्शनवर वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे. वरील बाबींचा विचार करुन प्राधिकरणाने मे.आकार अभिनव यांची संक्षिप्त प्रकल्प अहवाल बनविण्याकामी सल्लागार म्हणुन नेमणुक केली. मे.आकार अभिनव यांनी सदर प्रकल्पाचा संक्षिप्त अहवाल तयार करुन महापालिका आयुक्त व महानगर आयुक्त यांना दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१५ रोजी सादर केला. महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये सदर काम प्राधिकरणाने करावे असे कळविले. सल्लागाराने तयार केलेल्या प्रकल्प अहवालामध्ये दिलेल्या ५ पर्यायांपैकी पर्याय क्र.५ ची निवड करण्यात आली. तसेच भविष्यात वांद्रे-कुर्ला संकुलाचा होणारा विस्तार पहाता, वांद्रे-कुर्ला संकुलातून पूर्व द्रुतगती महामार्ग व पश्चिम द्रुतगती महामार्ग यांना थेट जोडमार्ग देण्याच्या दृष्टीने पर्याय क्र.५ मध्ये योग्य ते बदल करण्यात आले व वाकोला नाल्याच्या बाजूने वांद्रे-कुर्ला संकुलातून सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यापर्यंत उन्नत मार्ग व पश्चिम द्रुतगती महामार्गापासून वांद्रे कुर्ला संकुलास जोडणारा उन्नत मार्ग बांधण्याच्या दृष्टीने पर्याय क्र.५ ची आखणी करण्यात आली.

७.३ सदर दोन्ही उन्नत मार्ग हे भविष्यात वांद्रे-कुर्ला संकुलाचा होणारा विस्तार पाहता महत्वाचे आहेत. परंतू, वाकोला नाल्याच्या बाजूने वांद्रे कुर्ला संकुलातून सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यापर्यंत उन्नत मार्ग व पुढे पश्चिम द्रुतगती महामार्गास जोडणारा उन्नत मार्गासाठी मुंबई विद्यापिठाकडून जागा मिळणे अपेक्षित आहे व तद्नंतरच सदर काम हाती घेतले जाईल. या करीता सदर दोन्ही कामे भाग-१ व २ प्रमाणे हाती घेण्यात येतील व कुर्ला ते वाकोला जंक्शन उन्नत मार्गाची (भाग-१) संकल्पना करताना बी.के.सी ते वाकोला जंक्शन (वाकोला नाल्याच्या बाजूने) उन्नत मार्ग (भाग-२) जोडण्यासाठी योग्य ते प्रयोजन करुन त्याप्रमाणे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

७.४ कुर्ला ते वाकोला जंक्शन उन्नत मार्गाच्या (भाग-१) अंदाजित खर्चाची माहिती खालील प्रमाणेः-

| अ.क्र. | वर्णन | किंमत (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १. | प्रकल्पाच्या बांधणीचा बांधकामाचा अंदाजित खर्च | ३९३.९६ |
| २. | सल्लागार मानधन (@ २%) | ७.८७९२ |
| ३. | भाववाढ (@ १०%) | ३९.३९६ |
| ४. | आकस्मित खर्च (@ ५%) | १९.६९८ |
| ५. | सेवावाहिन्या हलविणे (@ ५%) | १९.६९८ |
| ६. | **प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च (भाग -१)** | **४८०.६३** |

बी.के.सी ते वाकोला जंक्शन (वाकोला नाल्याच्या बाजूने) उन्नत मार्गाच्या (भाग-२) अंदाजित खर्चाची माहिती पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | वर्णन | किंमत (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १. | प्रकल्पाच्या बांधणीचा बांधकामाचा अंदाजित खर्च | २१०.४७ |
| २. | सल्लागार मानधन (@ २%) | ४.२१ |
| ३. | भाववाढ (@ १०%) | २१.०५ |
| ४. | आकस्मित खर्च (@ ५%) | १०.५२ |
| ५. | सेवावाहिन्या हलविणे तसेच उच्चदाबाच्या विद्युतवाहिन्यांचे स्थलांतरण करणे (८%) | १६.८४ |
| ६. | **प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च (भाग -२)** | **२६३.०९** |

७.५ प्रस्तावित भाग-१ व २ या उन्नत मार्गामुळे कलानगर जंक्शन येथील वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. सद्यःस्थितीत कलानगर जंक्शन येथे एस.व्ही.रोड, वांद्रे-वरळी सी लिंक व माहीम अशी दक्षिणेकडून येणारी वाहतुक, पश्चिम द्रुतगती महामार्गावरून उत्तरेकडून येणारी वाहतूक व सायन धारावी मार्गे पूर्वेकडून येणारी वाहतूक यामुळे ब-याच प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत आहे व या वाहतूकीच्या कोंडीमध्ये बी.के.सी. येथून कलानगर मार्गे उत्तर व दक्षिणेकडे जाणाऱ्या वाहतूकीची भर पडत आहे. सदर प्रस्तावित उन्नत मार्गांमुळे बी.के.सी. मधून कलानगर जंक्शन मार्गे पूर्व व पश्चिम

उपनगराकडे होणारी वाहतुक कमी होणार आहे. तसेच सायन-धारावी मार्गावरुन पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे होणारी वाहतुक सुध्दा याच मार्गांने होणार आहे. या सर्व कारणांमुळे कलानगर जंक्शन येथील वाहतुकीची कोंडी बऱ्याच प्रमाणात कमी होईल व कलानगर जंक्शन येथील बी.के.सी. ते पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या दिशेने प्रस्तावित उड्डाणपुलाची (अंदाजे किंमत रु.१४०कोटी) गरज भासणार नाही. सदर प्रस्तावीत दोन्ही उन्नत मार्गांमुळे बी.के.सी. पासून पूर्व द्रुतगती महामार्ग व पश्चिम द्रुतगती महामार्ग यांना थेट जोडमार्ग तसेच मुंबई विमानतळ व प्रस्तावित नवी मुंबई विमानतळ यांच्यासाठी थेट जोडरस्ता तयार होणार आहे व भविष्यात वांद्रे-कुर्ला संकुल येथे होणारा विस्तार पाहता बी.के.सी.पासून अशा प्रकारे तयार होणा-या जोडणीचा बऱ्याच प्रमाणात फायदा होणार आहे. सदर प्रस्तावित कामातील बी.के.सी. जंक्शन व वाकोला जंक्शन येथील काम दाट वाहतूकीच्या रस्त्यावरून होत असल्याने येथील काम स्ट्रक्चरल स्टीलमध्ये करण्यात येणार आहे.

**निर्णय :** **चर्चेनंतर बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२८४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ-चेंबुर जोडरस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक / युनिर्व्हसिटी जंक्शन व बी.के.सी. जंक्शन मिळून मिठी नदी ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्ग बांधणे तसेच एम.टी.एन.एल जंक्शन, बी.के.सी. ते लालबहादूर शास्त्री मार्ग उड्डाणपूलास जोडणारा उन्नत मार्ग (भाग-१) बांधण्यासाठी अंदाजीत किंमत रू.४८०.६३ कोटी व बी.के.सी. ते वाकोला जंक्शन (वाकोला नाल्याच्या बाजूने) उन्नत मार्ग (भाग-२) बांधण्यासाठी अंदाजित किंमत रू.२६३.१० कोटी अशा भाग-१ व २ ची एकूण अंदाजित किंमत रू.७४३.७३ कोटी खर्चास प्राधिकरणाच्या बैठकीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ :** **मुंबई मेट्रो बृहत आराखडयातील मार्गाचे पुनर्विलोकन आणि सविस्तर प्रकल्प अहवालाचे अद्यावतीकरण करण्याकरीता दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्याबाबत.**

८.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी १४६.५० कि.मी. लांबीच्या मूळ बृहत आराखडयाची सद्यःस्थिती आणि त्यातील मार्गांचे अंमलबजावणी धोरण निश्चित करतेवेळी व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना बदल करुन सुधारीत लांबी १७२ कि.मी. झाल्याबाबत समितीस अवगत केले.

८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, दिनांक २० मे,२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सर्व उच्चस्तरीय अधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या वॉर रुम (War Room) बैठकीत मेट्रो मार्ग-२, ४ व इतर मेट्रो मार्गांबाबत तसेच पुढील ३ ते ४ वर्षात मेट्रो मार्गांची त्वरीत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संभाव्य उन्नत मेट्रो मार्गांवर सादरीकरण आणि सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीअंती संभाव्य उन्नत मेट्रो मार्गांचे पुनर्विलोकन आणि अद्यावतीकरण करण्याकरीता दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या शासकीय संस्थेस मेट्रो बृहत आराखडयाचा अहवाल तयार करण्याचा अनुभव आणि उपलब्ध असणारे तज्ञ मनुष्यबळ पाहता 'एकमेव स्त्रोत' तत्वावर नियुक्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यास अनुसरुन प्राधिकरणाने खालील मार्गाचे पुनर्विलोकन व सविस्तर प्रकल्प अहवाल अद्यावतीकरण करण्यासाठी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांची 'एकमेव स्त्रोत' तत्वावर नियुक्ती करण्याचे प्रस्तावित केले आहे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्या बरोबर केलेल्या चर्चेनंतर कामाची व्याप्ती ठरवून सदर कामाकरीता रु.७.४० कोटी (मार्गांची लांबी कमी / जास्त झाल्यास प्रति कि.मी. प्रमाणे) + सेवाकर इतक्या किंमतीवर त्यांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**तक्ता क्रमांक - १ :- त्वरीत अंमलबजावणी करण्यात येणारे संभाव्य उन्नत मेट्रो मार्ग :-**

| अ.क्र. | तपशिल | लांबी | वित्तीय प्रस्ताव (रु.कोटीत) |
|---|---|---|---|
| १ | मुंबई बृहत आराखडयातील मेट्रो मार्गांच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे अद्यावतीकरण | | |
| | (अ) डी. एन. नगर ते दहिसर | १८ कि.मी. | ०.९० |
| | (ब) अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) | १८ कि.मी. | ०.९० |
| | (क) वांद्रे ते मानखुर्द (वांद्रे-कुर्ला संकुल मार्ग) | १३ कि.मी. | ०.६५ |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | मेट्रो मार्गांचे पुनर्विलोकन व सविस्तर प्रकल्प अहवालाचे अद्यावतीकरण | | |
| | (अ) डी.एन.नगर ते वांद्रे-कुर्ला संकुल | १० कि.मी. | १.०० |
| | (ब)जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड - सिप्झ - कांजूर मार्ग | १० कि.मी. | ०.६५ |
| | (क) वडाळा - घाटकोपर - ठाणे - कासारवडवली (लाल बहादुर शास्त्री मार्गाऐवजी पूर्व द्रुतगती मार्गावरुन) | २२ कि.मी.<br>१० कि.मी. | १.६० |
| | (ड) वडाळा - जी.पी.ओ. व्हाया आर. ए. किडवाई मार्ग - बॅ. नाथ पै मार्ग, पी. डीमेला रोड | ८ कि.मी. | ०.८० |
| | (इ) अंधेरी (पूर्व) ते वांद्रे - कुर्ला संकुल (पश्चिम द्रुतगती मार्ग) | ९ कि.मी. | ०.९० |
| | **एकूण** | **११८ कि.मी.** | **७.४०** |

८.३ श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की, मेट्रो बृहत आराखडयामधील विविध मेट्रो मार्गांची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यासारख्या विविध संस्थांमार्फत अंमलबजावणी करुन घेण्याकरीता भौतिक आणि एकात्मीकरण संचलन (Physical & Operational Intergration) योग्य रीतीने कसे करता येईल याबद्दल दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. च्या TOR मध्ये दिलेल्या कामाच्या व्याप्तीमध्ये समावेश करण्यात यावा किंवा तशी शिफारस करुन घेण्यात यावी.

**निर्णय :** **चर्चेनंतर बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२८५ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम ३ चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांची ‘एकमेव स्त्रोत’ तत्वावर तक्ता क्र.१ मधील मार्गाचे पुनर्विलोकन, अद्यावतीकरण आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता **रु.७.४० कोटी (मार्गाची लांबी कमी / जास्त झाल्यास प्रति कि.मी. प्रमाणे) + सेवाकर** इतक्या किंमतीवर सल्लागार म्हणून नियुक्ती

करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रस्तावित मेट्रो मार्गाच्या लांबी मध्ये काही वाढ झाल्यास वर नमूद केलेल्या दरानुसार रु.७.४० कोटीच्या जास्तीत जास्त २०% पर्यंत वाढीव रक्कम सल्लागाराला देण्याकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : मोनोरेलला मध्यरेल्वेचा वडाळा व करी रोड येथील रुळ ओलांडण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या पुलाच्या पर्यवेक्षणाचे काम करण्याकरीता मे.राईटस् सल्लागार यांच्या नियुक्तीला वाढीव मुदत मिळणेबाबत.**

९.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या २२५व्या बैठकीत ठराव क्र.१११० अन्वये २० कि.मी. लांबीच्या संत गाडगे महाराज चौक - वडाळा - चेंबूर मार्गिकेवर मोनोरेल प्रकल्प राबविण्यासाठी मे.लार्सन ॲन्ड टुब्रो, इंडिया आणि स्कोमी इंजिनिअरिंग, बी.एच.डी. मलेशिया समुहाची कंत्राटदार म्हणून रु.२४६० कोटी (कर वगळून) या रक्कमेवर नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आली होती. सध्या टप्पा-१ वडाळा ते चेंबूरचे काम पूर्ण झाले असून, सदर टप्पा प्रवाशी वाहतुकीसाठी दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१४ रोजी खुला केला आहे. तसेच टप्पा-२ चे काम ८५% पूर्ण झाले असून, डिसेंबर, २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, टप्पा-२ वडाळा ते संत गाडगे महाराज चौक ही मोनोरेल मार्गिका मध्ये रेल्वेचे वडाळा व करी रोड रुळ ओलांडून जाते. सदर रुळ ओलांडण्यासाठी मध्य रेल्वेकडून परवानगी घेतली असून दिनांक ०३ जानेवारी, २०१२ रोजी मध्य रेल्वेबरोबर करारनामा करण्यात आला होता. सदर मध्य रेल्वेचे रुळ ओलांडण्यासाठी लोखंडी गर्डरचा उपयोग करण्याचे प्रस्तावित आहे.

९.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मध्य रेल्वे बरोबर झालेल्या करारनाम्यानुसार, रेल्वे रुळ ओलांडणा-या पुलाचे पर्यवेक्षण करण्यासाठी सल्लागार म्हणून मे.राईटस्, मे.इरकॉन या रेल्वे अंगिकृत संस्थांची मागणी केली होती. त्या अनुषंगाने मे.राईटस् यांची पर्यवेक्षण सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली होती. त्यासाठी वडाळा येथील पुलाचे काम रु.७.५ लक्ष + सेवा कर तसेच, करी रोड

येथील पुलाचे काम रु. ७.५ लक्ष + सेवा कर प्रति महिना असे ठरविण्यात आले होते. त्याअनुषंगाने वडाळा येथील पुलाचे काम १२ महिने व करी रोड येथील पुलाचे काम ६ महिन्यांमध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते. वरील प्रस्तावास दिनांक १० जुलै, २०१२ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २३४व्या बैठकीत रु.१.३५ कोटी (सेवाकर वगळून) इतक्या रक्कमेसाठी मंजुरी देण्यात आली होती. वडाळा येथे क्रमशः ३४.७४ मी., ४१.७६ मी. आणि ४०.२४ मी. लांबीचे तीन स्पॅन असून त्यामधील दोन स्पॅन BPT परिसरात येतात आणि एक लोकल हार्बर लाईन मध्ये येतो. रेल्वे सुरक्षा आयुक्त यांनी डिझाईन आणि Launching Scheme मध्ये वेळोवळी काही बदल सुचविले होते, त्यामुळे कार्यपध्दतीप्रमाणे २ ते ३ वेळा डिझाईन आणि Launching Scheme मध्ये बदल करावे लागले. तसेच करण्यात आलेले बदल रेल्वे मार्फत रेल्वे आयुक्तांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले होते. या कारणास्तव वडाळा आणि करी रोड येथील रेल्वे रुळ ओलांडण्याच्या कामास काही विलंब झाला. वडाळा रोड येथील गर्डर Launching चे काम पूर्ण झाले असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच करी रोड येथील गर्डर Launching चे काम प्रगतीपथावर आहे. वडाळा येथील पुलाचे काम ऑगस्ट, २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून या कामासाठी यापूर्वी दिलेल्या मान्यतेच्या कालावधीपासून १० महिने इतका कालावधी लागणार आहे. तसेच करीरोड येथील काम ऑक्टोबर, २०१५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे आणि या कामासाठी यापूर्वी दिलेल्या मान्यतेच्या कालावधीपासून १२ महिने इतका कालावधी लागणार आहे. सदर दोन्ही कामांसाठी प्रति महा रु. ७.५ लाख प्रमाणे २२ महिन्यांसाठी रु.१.६५ कोटी + सेवाकर इतका खर्च अपेक्षित आहे.

९.४ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्रकल्पाच्या कमी Ridership बद्दल विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, एकदा प्रकल्प संत गाडगे महाराज चौक (महालक्ष्मी) स्थानकापर्यंत कार्यान्वित झाल्यानंतर या मार्गावर सुमारे १.५ ते १.८ लाख प्रवासी दर दिवशी अपेक्षित आहेत. परंतू मोनोरेल सेवा ही मुंबई उपनगर किंवा मेट्रो रेल्वे सारख्या जलद परिवहन व्यवस्थेला पुरक व्यवस्था असल्यामुळे या व्यवस्थेची मेट्रो प्रकल्पाबरोबर तुलना करता येत नाही.

**निर्णय :** **चर्चेनंतर बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२८६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम ३ चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि

..१९/-

याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मे.राईटस् यांना वडाळा व करी रोड येथे रेल्वेमार्ग ओलांडण्यासाठी बांधण्यात येणा-या पुलाच्या पर्यवेक्षणाचे काम करण्यासाठी रु.१.६५ कोटी + सेवाकर इतक्या अतिरिक्त खर्चास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सल्लागाराच्या एकूण खर्चाच्या २०% पर्यंतच्या अतिरिक्त मनुष्यबळासाठी लागणा-या तफावत खर्चास मान्यता देण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत नेरळ-दस्तुरी रस्त्याचे रुंदीकरण व सुधारणा करणे या कामाच्या निविदेस मान्यता प्रदान करणेबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहीती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३४व्या बैठकीच्या ठराव क्र.१३०४ अन्वये रु.३६२८.५१ कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी आणि त्यांना सुरक्षित व सुलभतेने माथेरान येथे पोहोचण्यासाठी सदर रस्त्याच्या उपलब्ध जागेमध्ये (Right of way) नेरळ-दस्तुरी दरम्यान रुंदीकरण व सुधारीकरण तसेच रस्ता सुरक्षा बाबी इ. कामांचा अंतर्भाव असलेल्या प्रकल्पासाठी विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत प्रकल्पांतर्गत मान्यता देण्यात आली असून त्यासाठी रु.२७ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद आहे.

१०.२ सदर कामाची प्रथम ई-निविदा दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त झालेल्या ३ देकारांपैकी मे.वित्राग कन्स्ट्रक्शन कं. यांचकडून प्राप्त झालेला लघुत्तम देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (-) २१.६४% इतक्या कमी दराचा होता. निविदा समितीने काम करण्यासाठी प्रतिकूल परिस्थिती (उदा. डोंगराळ भाग, Eco-sensitive zone इ.) आणि इतर आर्थिक देकारच्या किंमतीमधील फरक इत्यादी बाबींचा विचार करता सदर देकार खुपच कमी किंमतीचा व अवाजवी असल्याचे नमूद करुन सदर लघुत्तम देकार अस्विकृत करण्याची शिफारस केली. त्या अनुषंगाने दुस-यांदा ई-निविदा मागविण्याचे ठरले.

..२०/-

१०.३ व्दितीय ई-निविदा सुचना दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आली. कामाची गुणवत्ता नियंत्रण उत्तम राखण्याच्या दृष्टिने SCADA पध्दत राबविण्याची अट दुस-यांदा मागविलेल्या निविदेमध्ये समाविष्ट करण्यात आली तसेच निविदेमध्ये भौगोलिक अडचणी, Eco-sensitive zoneच्या अनुषंगाने संविधानिक बाबी, प्रकल्प राबविताना येणा-या संभाव्य अडचणी इत्यादींचा उल्लेख ठळकपणे करण्यात आला. व्दितीय ई-निविदा सुचनेस अनुसरुन प्राप्त झालेल्या ३ देकारांपैकी मे.वित्राग कन्स्ट्रक्शन कं. यांच्याकडून प्राप्त झालेला देकार अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (-) ७.०२% इतक्या कमी दराचा आहे. निविदा समितीच्या बैठकीत, व्दितीय ई-निविदा सुचनेमधील सुधारणा लक्षात घेवून सदर निविदेबाबत सविस्तर चर्चा झाली. पारदर्शी ई-निविदा पध्दत, सर्व पात्र निविदाकारांचे प्राप्त झालेले जवळपासच्या दराचे देकार, इत्यादी बाबींमुळे व्दितीय निविदेस अनुसरुन प्राप्त झालेले प्रथम निविदा सुचनेस अनुसरुन प्राप्त झालेल्या देकारापेक्षा जास्त दराचे पण अदांजपत्रकीय किंमतीपेक्षा कमी दराचे व वाजवी असल्याचे मत नोंदवून सदर लघुत्तम देकाराची निविदा स्विकारण्याची शिफारस करण्यात आली.

१०.४ याबाबत कार्यकारी समितीचे सदस्य श्री. अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दोन्ही निविदा सुचनेनुसार प्राप्त झालेला लघुत्तम देकार वेगवेगळया दराचा पण एकाच निविदाकाराचा असल्यामुळे सदर निविदा स्विकृत करण्यात येऊ नये व फेर निविदा मागवावी अशी सूचना केली. यावर महानगर आयुक्त यांनी सदर निविदा प्रक्रिया ई-निविदा पध्दतीने पार पाडण्यात आली असून, सदर ई-निविदा पध्दतीव्दारे तिस-यांदा मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये तशीच समान परिस्थीती निर्माण होऊ शकते असे विषद केले.

१०.५ यावर कार्यकारी समितीचे सदस्य श्री. अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अतिरीक्त बाबी (Extra Items) आणि अतिरीक्त परिमाणे (Excess Quantity) आणि त्यांचे दर यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे मत नोंदवले व त्यास अनुसरुन कंत्राटीय अटींमध्ये अंशतः बदल करुन नव्याने (Fresh) निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

**बाब क्र.११ : विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत प्रकल्पांतर्गत नेरळ - दस्तुरी रस्त्याचे (राज्य महामार्ग - १०९) रुंदीकरण व सुधारीकरण करणे या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) नेमणे.**

सदर बाब टिप्पणी ही **बाब क्र.१०** - विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत नेरळ-दस्तुरी रस्त्याचे रुंदीकरण व सुधारणा करणे या कामाच्या निविदेस मान्यता प्रदान करणेबाबत. - या विषयाशी निगडित असल्यामुळे सदर विषयावर चर्चा करण्यात आली नाही.

**बाब क्र.१२ : महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्षांचे नामनिर्देशन करण्याबाबत.**

१२.१ या विषयावर चर्चा करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर नामवंत व्यक्तींची संस्थेचे सह-अध्यक्ष म्हणून नेमणूक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने करावयाची असते. संस्थेच्या अशासकीय सदस्यांचा कालावधी ३ वर्षाचा आहे. त्यानुसार महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या सह-अध्यक्षा, श्रीमती फिरोझा जे. गोदरेज यांचा ३ वर्षाचा सदस्यत्वाचा कालावधी दिनांक ०९ जुलै, २०१५ रोजी संपलेला आहे. तरी, रिक्त झालेल्या सह-अध्यक्ष या पदावर एका नामांकित व्यक्तीचे नामनिर्देशन करण्याचा प्रस्ताव आहे.

त्यावर सदस्यांनी अशी सुचना केली की, मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती, महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण व प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी बैठक घेऊन एका नामांकित व्यक्तीची सदर संस्थेचे सह-अध्यक्ष म्हणून नामनिर्देशन करण्यात यावे.

**निर्णय : त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला.**

**ठराव क्र. १२८७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियमावलीतील नियम क्र.९ च्या पोट-नियम (दोन) आणि नियम क्र.१२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेवर सह-अध्यक्ष म्हणून पुढील ३ वर्षाकरीता एका नामांकित व्यक्तीचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा.मुख्य सचिव व अध्यक्ष कार्यकारी समिती, महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण व प्रधान सचिव, पर्यावरण विभाग या त्रिसदस्यीय समितीस प्रदान करण्यात येत आहेत.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : देना बँक मुदत ठेव अपहार प्रकरण**

१३.१ या प्रस्तावाविषयी महानगर आयुक्तांनी सविस्तर माहिती दिली.

१३.२ प्राधिकरणातील ठेवींबाबत देना बँकेमध्ये झालेले अपहार प्रकरण पाहता मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्राधिकरणाच्या ठेवींची रक्कम काढून घेण्यात आली आहे (Siphoned off) की कसे? याबाबत विचारणा केली. महानगर आयुक्त यांनी सदरहू बाबत विशद करताना असे सांगितले की, प्राधिकरणाने देना बँकेकडे नियत तारखेला ठेवींची रक्कम परत करण्याकरीता विनंती केली होती. तथापि बँकेने प्रस्तुत प्रकरण सी.बी.आय. कडे असल्याने व तपासकार्य चालू असल्याने प्राधिकरणाच्या पूर्णतः ठेवी रु.३५१.५० कोटींचे पुढील एक वर्षाकरीता नूतनीकरण केले व सदरहू प्रमाणपत्रे बँकेकडेच ठेवून घेत प्राधिकरणाचा निधी देना बँकेमध्ये असल्याबाबतचे Balance Confirmation प्रमाणपत्रही वेळोवेळी दिले. परंतु, बँकेने नियत दिनांकास ठेवी परत केलेल्या नसल्याने प्राधिकरणाला पुढील कायदेशीर मार्गांचा अवलंब करावा लागणार आहे असे नमूद केले. यापुढे असेही निदर्शनास आणून दिले की, प्रस्तुत अपहार प्रकरणी सी.बी.आय. ने देना बँक मॅनेजर व इतर तीन व्यक्तींविरुध्द चार्जशिट दाखल केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणासाठी प्राधिकरण National Consumer Dispute Redressal Commission मध्ये दावा दाखल करण्याच्या तयारीत आहे. चर्चेअंती, कार्यकारी समितीने प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीची तसेच यासंदर्भात वित्त विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक २४ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयाची नोंद घेतली व याबाबत आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याचे निदेश महानगर आयुक्त यांना दिले.

**बाब क्र.१४ : प्राधिकरणाचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय : प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**बाब क्र.१५ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी - सहामाही व्यवस्थापन अहवाल - ०१ ऑक्टोबर, २०१४ ते ३१ मार्च, २०१५**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१४ ते दिनांक ३१ मार्च, २०१५ चा सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : सदरहू सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**<u>बाब क्र.१६ :</u>** **<u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ जानेवारी, २०१५ ते ३० जून, २०१५</u>**

दिनांक ०१ जानेवारी, २०१५ ते दिनांक ३० जून, २०१५ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका/वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>निर्णय :</u>** **<u>सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.</u>**

**<u>बाब क्र. १७ :</u>** **<u>वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मेट्रो मार्गाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी M/s.SENER India Engineering & Systems Pvt. Ltd., New Delhi with Amiand Consulting Pvt.Ltd. (संयुक्त उपक्रम) यांची स्वतंत्र अभियंता म्हणून नियुक्ती करण्याबाबत.</u>**

१७.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर (मेट्रो मार्ग-१) हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी सहभागाव्दारे बांधा, वापरा, स्वामित्व घ्या आणि हस्तांतरीत करा (PPP/BOOT) या तत्वावर राबविण्यात आला. मे. रिलायन्स एनर्जी लि., व्हिओलिया ट्रान्सपोर्ट (फ्रान्स) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा समावेश असलेले विशेष हेतूपुरस्पर वाहन (SPV) मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लि. यांच्या मार्फत अंमलबजावणी करुन सदर मेट्रो प्रकल्प प्रवासी वाहतूकीसाठी दिनांक ०८ जून, २०१४ रोजी खुला करण्यात आला.

१७.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, विशेष हेतूपुरस्पर वाहन (SPV), सवलतदार (Concessionaire) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सवलतदार मंजूर करणारी संस्था) यांच्या दरम्यान स्वतंत्रपणे आणि योग्यप्रकारे काम करण्याकरीता एका स्वतंत्र अभियंत्याची (Independent Engineer) नेमणूक करणे सवलत करारनाम्याप्रमाणे (Concession Agreement) आवश्यक आहे त्या अनुषंगाने मे.लुईस बर्जर इन्कॉ (यु.एस.ए.) - राईट्स लि. (जेव्ही) यांची माहे एप्रिल, २००७ ते डिसेंबर, २०१४ पर्यंत नेमणूक करण्यात आली होती.

१७.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे.लुईस बर्जर इन्कॉ (यु.एस.ए.) - राईट्स लि. (जेव्ही) यांचा स्वतंत्र अभियंता म्हणूनचा कालावधी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये संपला असून, सवलत करारनाम्यानुसार देखभाल व दुरुस्ती (O & M) काळात यंत्रणेची कार्यक्षमता तसेच स्थापत्य बांधकाम, विद्युत आणि इतर सर्व उप-यंत्रणेची नियमितपणे तपासणी करणे आवश्यक आहे. सवलत

..२४/-

करारनाम्यातील तरतूदीनुसार सवलतदार व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या परस्पर संमतीने मेट्रो मार्गाच्या देखभाल व दुरुस्ती कामाचा स्वतंत्रपणे अहवाल देण्याकरीता स्वतंत्र अभियंत्याची नेमणूक करावयाची आहे. स्वतंत्र अभियंत्याचा होणारा खर्च मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लि. आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सवलत करारनाम्यातील कलम २०.३ प्रमाणे ५०:५० या प्रमाणात करावयाचा आहे.

१७.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, आवश्यक त्या सर्व बाबींचा विचार करुन प्राधिकरणाने वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्ती कामासाठी स्वतंत्र अभियंत्याची १ वर्षासाठी नेमणूक करण्याकरीता नामांकित सल्लागाराकडून दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन विनंती प्रस्ताव मागविण्यात आले. निविदा सादर करण्याच्या शेवटच्या तारखेस एकूण ५ प्रस्ताव प्राप्त झाले, त्याची यादी खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Name & Address of Firm | Joint Venture |
|---|---|---|
| 1 | Mott Mac Donald, Mumbai | -- |
| 2 | Ayesa Ingenieria Y. Arquitecture S.A.U. | Feed Back Venture Pvt.Ltd., Gurgaon |
| 3 | SENER India Engineering & Systems Pvt.Ltd., New Delhi | Amiand Consulting Pvt.Ltd. |
| 4 | Seoul Metropolitan Rapid Transit (SMRT) | Lahmeyer International India Pvt. Ltd., New Delhi |
| 5 | DAPPLONIA S.P.A. Mumbai | -- |

१७.५ महानगर आयुक्त यांनी त्यानंतर असे सांगितले की, प्राप्त झालेल्या प्रस्तावांचे तांत्रिक व वित्तीय मूल्यमापन, मूल्यमापन समिती (Evaluation Committee) मार्फत करण्यात आले. विनंती प्रस्तावात नमूद केलेल्या खंड ५ अन्वये ज्या सल्लागारांच्या तांत्रिक प्रस्तावाला कमीत-कमी ८० व त्यापेक्षा जास्त गुण मिळाले, त्या सल्लागारांना पात्र ठरविण्यात येईल. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी झाल्यानंतर विनंती प्रस्तावात आवश्यक असलेल्या अनुभवास पात्र नसलेले २ प्रस्ताव अपात्र ठरविण्यात आले व उर्वरीत ३ प्रस्तावांचे सविस्तर तांत्रिक मुल्यमापन करण्यात आले. तांत्रिकदृष्टया पात्र निविदाकारांचे वित्तीय प्रस्ताव दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी सल्लागारांच्या प्रतिनिधिंच्या उपस्थितीत उघडण्यात आले. विनंती प्रस्तावास अनुसरुन तांत्रिक व वित्तीय गुण संयुक्त करताना तांत्रिक निकषाला ८०% भार आणि

वित्तीय निकषाला २०% भार देण्यात आला. सल्लागारांचे तांत्रिक गुण, सल्लागार फी, वित्तीय गुण आणि संयुक्त गुण खालील तक्यात नमूद केले आहेत :-

| अ.क्र. | सल्लागाराचे नांव | तांत्रिक गुण | एकत्रित नमूद केलेली फी (रु.) | आर्थिक गुण | संयुक्त गुण (०.८ x तांत्रिक गुण + ०.२ x आर्थिक गुण) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | SENER India Engineering & Systems Pvt.Ltd. New Delhi Mumbai, India | ८२.३० | १,६६,५०,०००/- | १०० | ८५.८४ | I |
| २. | Seoul Metropolitan Rapid Transit (SMRT) | ९२.०३ | ७,७७,१८,०००/- | २१.२४ | ७७.९१ | II |
| ३. | DAPPLONIA S.P.A. Mumbai | ८२.५० | २०,३८,८७,६३२/- | ८.१७ | ६७.६३ | III |

१७.६ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, SENER India Engineering & Systems Pvt.Ltd., New Delhi with Amiand Consulting Pvt.Ltd. (संयुक्त उपक्रम) यांना संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण असल्यामुळे मुल्यमापन समितीने संयुक्त मूल्यामापन अहवालात त्यांची स्वतंत्र अभियंता म्हणून नेमणूक करण्याची शिफारस केली त्याअनुषंगाने त्यांना स्वतंत्र अभियंता म्हणून नेमण्याचे प्रस्तावित आहे.

**निर्णय :** **चर्चेनंतर बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२८८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम ३ चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मेट्रो मार्गाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी SENER India Engineering & Systems Pvt.Ltd., New Delhi with Amiand Consulting Pvt.Ltd. (संयुक्त उपक्रम) यांची स्वतंत्र अभियंता (सल्लागार) म्हणून रु.१,६६,५०,०००/- (एक कोटी सहासष्ट लाख पन्नास हजार मात्र) + सेवाकर इतक्या शुल्कावर एका वर्षाकरीता नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

..२६/-

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र. १८ : वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंडाचे वितरण - मे.सीबीआरई साऊथ एशिया प्रा.लि. संस्थेची ‘सल्लागार’ म्हणून नेमणूक करणेबाबत.**

१८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रातील प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनींचे वितरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील तरतूदींनुसार करण्यात येते. प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलातील बहुतांशी भूखंड हे वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन, निविदा मागवून वितरीत केलेले असून निविदा मागविताना ‘‘राखीव दर’’ ठेवला जातो. या राखीव दरापेक्षा जास्त व उच्चतम दर नमूद केलेल्या निविदाकारास भुखंडाच्या वाटपाचे देकारपत्र निर्गमित करण्यात येऊन देकार पत्र स्विकृत केल्यानंतर व भाडेपट्टा मूल्य अदा केल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील प्र-नमुन्यातील भाडेपट्टा विलेख साक्षांकित करण्यात येतो. सन २०१० मध्ये वांद्रे-कुर्ला संकुलातील ‘‘जी’’ विभागातील भूखंड वितरीत करण्याकरीता रु.३,००,०००/- प्रति चौ.मी. बांधीव क्षेत्र (Built up area) हा दर राखीव दर नमूद करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या, परंतु सदर निविदा सुचनेस सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसून सदर भूखंडाकरीता एकही निविदा प्राप्त झाली नाही. सदरचा अनुभव लक्षात घेता, वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंडाकरीता निविदा काढावयाची की नाही या संदर्भात चर्चा करण्यात आल्या. चर्चेअंती असे निदर्शनास आले की, स्थावर मालमत्ता (Real Estate) बाजारभाव तितकासा तेजीत नसल्याने प्राधिकरणाच्या वाणिज्यिक भूखंडाकरीता उपरोक्त नमूद राखीव दरापेक्षा जास्त दर मिळेल याबाबत निश्चितता नसल्याने सन २०१० नंतर एकही निविदा काढण्यात आली नाही.

१८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता, प्राधिकरणामार्फत यापुढे निविदा काढताना कोणती कार्यप्रणाली अवलंबावयाची याबाबत चर्चा केली असता असे निदर्शनास आले की, फक्त वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन संभाव्य ग्राहक / खरेदीदार यांना आकर्षित करणे शक्य नसून प्राधिकरणाच्या जमिनीची / भूखंडाची विल्हेवाट (Disposal) करताना निविदा प्रक्रियेचे जागतिक

स्तरावर अनुसरण (Follow up) करणे आवश्यक असून संभाव्य ग्राहक /खरेदीदारांपर्यंत तसेच जागतिक निगमांपर्यंत (International Coporate) आपली जाहिरात आणि हेतू पोहचण्याकरीता प्रयत्न करणेही आवश्यक आहे. उपरोक्तच्या अनुषंगाने, मार्गदर्शन करण्यासाठी एखाद्या व्यावसायिक संस्थेची नियुक्ती करणे आवश्यक वाटले. यासंदर्भात माहिती घेतली असता असे कळले की, मे.सीबीआरई साऊथ एशिया प्रा.लि. ही जागतिक दर्जाची संस्था वांद्रे-कुर्ला संकुलातील मालमत्ता हस्तांतरण / व्यवहार / मुल्यांकन (valuation) व तत्सम कामे करीत असून त्यांना मालमत्ता वितरण / विक्री / हस्तांतरण / मुल्यांकन (valuation) व तत्सम क्षेत्रामध्ये मोठा अनुभव आहे व प्राधिकरणाच्या भूखंडाच्या यापुढील निविदा प्रणालीमध्ये त्यांचा सल्ला / मार्गदर्शन उपयोगी पडेल. सबब, त्यांचेशी प्राथमिक चर्चा केल्यानंतर मे.सीबीआरई साऊथ एशिया प्रा.लि. यांनी प्राधिकरणाच्या जमिनी / भूखंड वितरीत (Dispose off) करण्याकरीता त्यांची नियुक्ती करण्याबाबतचा, त्यांच्या कार्याची व्याप्ती व अटी व शर्ती समावेशक प्रस्ताव प्राधिकरणास त्यांच्या दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजीच्या पत्रान्वये सादर केला.

१८.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरणास, जमिनीच्या/भूखंडाच्या वितरणाबाबत (Dispose off) येणा-या अडचणींवर मात करुन राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवरील संभाव्य ग्राहकांना आकर्षित करुन मागील निविदेमधील उच्चतम दरापेक्षा म्हणजेच राखीव दरापेक्षा जास्त दर अपेक्षित दर मिळण्यासाठी मे.सीबीआरई साऊथ एशिया प्रा.लि. या संस्थेची ‘‘सल्लागार’’ म्हणून नियुक्ती करणे संयुक्तिक होईल असे मत झाल्याने त्यांच्या सेवेकरीता त्यांना अदा करावयाच्या शुल्कासंदर्भात त्यांचेशी चर्चा / विनिमय करुन ०.१% व जास्तीत जास्त मर्यादा रु.१ कोटी इतके शुल्क अदा करण्यात येईल असे निश्चित केले आहे. तथापि सदर शुल्क केवळ निविदा प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण होऊन निविदाकाराने भूखंडाचा देकार स्विकारल्यानंतर देय होईल व निविदा प्रक्रियेमध्ये समाधानकारक निविदा प्राप्त न झाल्यास किंवा कोणत्याही कारणामुळे निविदा प्रक्रिया यशस्वी न झाल्यास ठरलेले शुल्क देय होणार नाही या अटीवर प्राधिकरणाने आपल्या दिनांक ०१ जून, २०१५ रोजीच्या पत्रान्वये देकारपत्र निर्गमित केले असून सदरचा देकार त्यांनी दिनांक ३ जून, २०१५ रोजी स्विकारला आहे.

१८.४ सदरच्या प्रस्तावावर साकल्याने विचार करुन सदस्यांनी असे मत प्रदर्शित केले की, सल्लागाराची अशाप्रकारची नियुक्ती करणे संयुक्तिक असते. तरी अशाचप्रकारे कामकाज करणा-या काही इतर नामी संस्थांकडूनही बोली मागविण्यात यावी व अशा संस्थांच्या कार्याचे मूल्यमापन व मागणी केलेले शुल्क विचारात घेऊन सदरच्या कामकाजाकरीता सल्लागाराची नियुक्ती करणे योग्य ठरेल.

१८.५ उपरोक्त प्रमाणे मत विचारात घेता सदरचा प्रस्ताव मागे घेण्यास अनुमती देऊन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन तसा प्रस्ताव समितीच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर करावा असे सुचित करण्यात आले.

**बाब क्र. १९ : महानगर आयुक्तांना प्रकल्पाच्या खर्चाबाबतचे सुधारीत आर्थिक अधिकार प्रत्यायोजित करण्याबाबत.**

१९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या १३४ व्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेशात हाती घेण्यात येणाऱ्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत नविन उड्डाणपूले, रस्ते बांधणे इ. कामांच्या एकूण रु.३६२८.५१ कोटींच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली. वरील कामांमध्ये एकूण २९ उड्डाणपूल, ३ खाडी वरील पूल, १३३ कि. मी. चे रस्तेबांधणी तसेच ३ भूयारी मार्गांच्या बांधकामांचा समावेश आहे. वर उल्लेखित कामांमध्ये प्रस्तावित वसई - भाईंदर यांना जोडणारा खाडीवरील पूल, घाटकोपर - कोपरखैरणे यांना जोडणारा खाडीवरील पूल, रेवस कारंजा खाडीवरील पूल तसेच सांताक्रुझ - चेंबूर जोडमार्गावरील नविन प्रस्तावित उन्नत मार्ग या मोठया किंमतीच्या कामांचा समावेश नाही. वरील कामे तातडीने सुरु करण्यासाठी प्रकल्प सल्लागारांची नियुक्ती लवकर करुन जेणेकरुन प्रकल्पाचा प्राथमिक अभ्यास जसे भौगोलिक सर्वेक्षण करणे, वाहतूकीचा अभ्यास करणे, वाहनांचे उगम गंतव्य स्थानांचे सर्व्हेक्षण करणे, पर्यावरणावरील परिणामांचे मुल्यांकन करणे (EIA), प्रकल्प व्यवस्थापन इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. तसेच मंजूर कामांमधील काही कामे तातडीने सुरु करणे आवश्यक आहे. महानगर आयुक्तांना कार्यकारी समितीने दिलेले सध्याचे आर्थिक अधिकार मर्यादित स्वरुपाचे असून कामांच्या अंदाजपत्रकांची किंमत मोठी असल्यामुळे कामांच्या निविदा तसेच सल्लागारांच्या निविदा मंजुरीस बराच कालावधी जातो. दरम्यानच्या काळात झालेली दरवाढ तसेच प्राधिकरणाकडे सोपविल्या जाणा-या विविध जबाबदा-या विचारात घेता, दिलेल्या अधिकारांमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. सबब महानगर आयुक्तांना रु. २५ कोटी पर्यंतच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे व रु. ५० कोटीं पर्यंतच्या कामांच्या निविदा मंजूर करण्याचे सुधारीत आर्थिक अधिकार प्रदान करण्यात यावेत असे प्रस्तावित केले.

१९.२ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, यापूर्वी प्रशासकीय मंजुरीचे अधिकार महानगर आयुक्तांना कशा स्वरुपाचे होते? यावर महानगर आयुक्त यांनी

..२९/-

असे सांगितले की, यापूर्वी महानगर आयुक्तांना रु. १० कोटी पर्यंतच्या कामांना प्रशासकीय मंजुरी व निविदा स्विकारण्याचे अधिकार कार्यकारी समितीने प्रत्यायोजित केले आहेत. याबाबत महानगर आयुक्तांनी विषद करताना असे सांगितले की, प्रस्तावात रु. १० कोटी ऐवजी रु. २५ कोटी पर्यंतच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देऊन निविदा मागविणे तसेच त्यापुढील रकमेच्या परंतु रु. ५० कोटी पर्यंतच्या कामांची प्रशासकीय मंजुरी कार्यकारी समिती व प्राधिकरणाकडून घेतल्यानंतर सदर कामांच्या निविदा स्विकारण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रस्तावित करण्यात आले आहेत.

१९.३ चर्चेदरम्यान श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, सल्लागारांच्या निविदा प्राधिकरणाअंतर्गत एक समिती नेमून निविदांचे तांत्रिक मूल्यमापन व शिफारशी नंतरच स्विकारण्यात याव्यात. तसेच कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी व कंत्राटातील बाबींच्या परिमाणांमध्ये वाढ झाल्यास सदर बाबींचे दर कामाशी संलग्न नसलेल्या अधिक्षक अभियंत्याकडून पडताळणी करुन घेण्यात यावे.

१९.४ प्रकल्पासाठी सल्लागाराची निविदा मागवून नेमणूक करण्याच्या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्तांनी असे विषद केले की, प्राधिकरणाकडील कामांच्या ढोबळ अंदाजपत्रकांची किंमत लक्षात घेता सध्याचे महानगर आयुक्तांना असलेले रु.५० लाखापर्यंतचे आर्थिक अधिकार मर्यादित स्वरुपाचे असून प्रस्तावित कामांच्या अंदाजपत्रकांची किंमत मोठी असल्यामुळे सल्लागारांच्या निविदांसाठी कार्यकारी समितीच्या मंजूरी करीता बराच कालावधी जातो. प्रकल्पांचा प्राथमिक अभ्यास व निविदापूर्व कामे जलदगतीने पूर्ण करण्याकरीता रु.५ कोटी पर्यंतच्या शुल्क असलेल्या सल्लागारांची नेमणूक करण्याचे सुधारीत आर्थिक अधिकार प्रदान करण्याचे प्रस्तावित केले.

महानगर आयुक्तांनी पुढे असेही विषद केले की, शासकीय क्षेत्रातील नामवंत संशोधन संस्था जसे भारतीय औद्योगिक संस्था (IIT), केंद्रीय रस्ते संशोधन संस्था (CRRI), राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (NEERI) इत्यादी तत्सम संस्थांना सल्लागार म्हणून थेट नेमणूकीचे पूर्ण आर्थिक अधिकार देण्याचे प्रस्तावित आहे.

१९.५ प्रकल्पांच्या कंत्राटातील अतिरिक्त खर्चास सुधारीत मान्यता देण्याच्या प्रस्तावाबाबत माहिती देतांना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे तांत्रिक आवश्यकता व प्रकल्प ठिकाणच्या अडचणींच्या अनुषंगाने बदल झालेल्या बाबी अथवा परिमाणे यामुळे झालेली वाढ या व्यतिरीक्त इतरही काही बाबींमुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ होत असते. याशिवाय कंत्राटदारास कंत्राटातील तरतूदीनुसार भाववाढ सुध्दा अदा करावी लागते.

कार्यकारी समितीच्या ठराव क्र.९७१ नुसार कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी उपस्थित झाल्यास किंवा कंत्राटातील बाबींच्या परिमाणांमध्ये वाढ झाल्यास त्यांची देयके देणे यासाठी कामाच्या खर्चामध्ये मंजूर रक्कमेच्या २०% पर्यंतच्या वाढीस मंजुरी दिली आहे. कामाची निविदा स्विकारतांना कंत्राटाच्या किंमतीस तसेच करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता दिली जाते. कार्य प्रगतीपथावर असताना कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबीच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटाच्या मंजूर रक्कमेच्या २०% पर्यंत खर्च व त्या व्यतिरिक्त कंत्राटातील तरतूदींनुसार देय असलेला भाववाढीचा खर्च मंजूर करणे अशी सुधारणा ठराव क्र.९७१ मध्ये प्रस्तावित आहे.

**निर्णय :-** **त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : -**

**ठराव क्र. १२८९ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (५) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व आधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे, महानगर आयुक्त यांना खालील सुधारित आर्थिक अधिकार प्रदान करीत आहे :-

१. रु. २५ कोटी पर्यंत खर्चाचे प्रकल्प व योजना यासाठी प्रशासकीय मंजुरी देऊन निविदा मागविणे तसेच रु. ५० कोटी पर्यंतच्या कामांच्या निविदा स्विकारणे / मंजूर करणे.

२. प्रकल्पासाठी सल्लागाराची नेमणूक करण्याकरीता प्रचलित पध्दतीने निविदा मागवून रु. ५ कोटी पर्यंत शुल्क असलेल्या सल्लागारांची नेमणूक करण्याचे तसेच शासकीय क्षेत्रातील नामवंत संशोधन संस्था जसे भारतीय औद्योगिक संस्था (IIT), केंद्रीय रस्ते संशोधन संस्था (CRRI), राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था (NEERI) इत्यादी तत्सम संस्थांना सल्लागार म्हणून थेट नेमणूकीचे पूर्ण आर्थिक अधिकार देण्यात येत आहेत.

३. कार्यकारी समितीच्या दिनांक १५ जुलै, २००५ रोजी झालेल्या २१२व्या बैठकीतील ठराव क्र. ९७१ मध्ये सुधारणा करून कार्य प्रगतीपथावर असतांना कंत्राटात नमूद नसलेल्या अतिरिक्त बाबी (Extra Items) व कंत्राटातील बाबींच्या परिमाणांमधील वाढीपोटी (Excess Quantities) कंत्राटाच्या मंजूर रकमेच्या २०% पर्यंत खर्च व त्या व्यतिरिक्त कंत्राटातील तरतूदींनुसार देय असलेला भाववाढीचा खर्च मंजूर करणे.

**बाब क्र.२० : प्राधिकरणाचे दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय : प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**पटल बाब क्र.१ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांचा माहे जून, २०१५ अखेरचा अहवाल.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली.

**निर्णय : अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

----------xox----------

**जोडपत्र**

**जोडपत्र**

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४५वी बैठक

**दिनांक : २१ जुलै, २०१५**

**: ठराव :**

"श्री. चार्ल्स कोरीया, माजी सदस्य, कार्यकारी समिती यांचे दिनांक १६ जून, २०१५ रोजी निधन झाले. श्री.कोरीया हे दिनांक २७ डिसेंबर, १९७५ ते १९ मे, १९८३ या कालावधीत प्राधिकरणाच्या भूतपूर्व गृहनिर्माण नागरी नुतनीकरण व परिसर विज्ञान मंडळाचे अध्यक्ष या नात्याने कार्यकारी समितीचे सदस्य होते. तर, दिनांक २६ जुलै, १९८३ ते १७ जून, १९९४ या कालावधीत कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य होते. या काळात श्री.कोरीया यांनी कार्यकारी समितीच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. ही समिती, त्यांच्या दु:खद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे."

**********